**ठळक बातम्या**

- वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्धाटन, राज्यात सर्वत्र सामूहिक वंदे मातरम गायनाचं आयोजन

- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करायच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उच्च न्यायालयाकडून राज्य निवडणूक आयोगाला नोटिस

- क्रिकेट विश्वचषक विजेत्या महिला संघातल्या महाराष्ट्रातल्या खेळाडूंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**आणि**

- ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्यावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाची आज सुरुवात झाली. हे गीत बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी दीडशे वर्षांपूर्वी लिहिलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं ‘वंदे मातरम्’ शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं उद्धाटन केलं. ‘वंदे मातरम्’ हा एक मंत्र आहे, एक ऊर्जा आहे, एक स्वप्न आणि एक संकल्प आहे, असं प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितलं. हे गीत म्हणजे भारतमातेप्रति भक्ती आणि आदर व्यक्त करणारा भाव आहे, जो आपल्याला इतिहासाशी जोडतो, वर्तमानात आत्मविश्वास निर्माण करतो आणि भविष्यासाठी नवसंजीवनी देतो, असंही ते म्हणाले.

**होल्ड-- बाईट - प्रधानमंत्री**

या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी एक विशेष टपाल तिकीट आणि नाणं प्रकाशित केलं. तसंच ‘vandemataram150.in’ हे विशेष पोर्टलही सुरू केलं. वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त देशभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त अभिवादन केलं आहे. स्वातंत्र्यसमराच्या काळात ब्रिटिशांच्या विरोधात संन्यांशांनी पुकारलेल्या बंडाच्या वेळी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी या अमर गीताची रचना केली होती, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला अभिवादन केलं. हे राष्ट्र भावना जागवणारं आणि पिढ्यांना प्रेरणा देणारं शाश्वत गीत आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

हे राष्ट्रीय गीत भारताच्या सामूहिक चेतनेचं प्रतीक आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

वंदे मातरम् या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांची विशेष मुलाखत आज रात्री ८ वाजता दिल्लीवरून प्रसारित होणार आहे. मुंबईसह राज्यातली सर्व केंद्रं ही मुलाखत सहक्षेपित करतील. त्यामुळे रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं मराठी राष्ट्रीय बातमीपत्र आज ८ वाजून ३० मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><><>

वंदे मातरम शतकोत्तर सुर्वणमहोत्सवानिमित्त देशात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग यांनी आज राष्ट्रीय गीताचं स्मरण केलं. या विशेष सभारंभाची सुरूवात

सामुहिक वंदे मातरम् गायनानं झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. हा कार्यक्रम राष्ट्राचा सन्मान, त्याग आणि कर्तव्याप्रति समर्पित राहण्याची वचनबध्दता दाखवतो, असंही या संदेशात म्हटलं आहे.

नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवनातही आज वंदे मातरम गायनाचा कार्यक्रम झाला. अनेक कलाकारांनी एकत्र येऊन राष्ट्रीय गीत गायलं. वृत्त विभागाचे अतिरिक्त महासंचालक धीरज काकडीया या कार्यक्रमाला उपस्थित होते.

हे राष्ट्रीय गीत भारताच्या सामूहिक चेतनेचं प्रतीक आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या गीतानं स्वातंत्र्य चळवळीला नवी दिशा दिली, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र वंदे मातरम या गीताचं आज सामूहिक गायन करण्यात आलं. मुंबईत मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत वंदे मातरम् गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं.

इतरत्र झालेल्या कार्यक्रमांबाबत हा वृत्तांत…

## व्हॉईस कास्ट -(१ मिनिट ७ सेकंद)

*(मुंबई विद्यापीठात यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग आणि आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे सुमारे १२ हजाराहून अधिक विद्यार्थी या समूहगानात सहभागी झाले होते.***नवी मुंबई** *महानगरपालिका मुख्यालयातल्या ॲम्फिथिएटरमध्ये ‘वंदे मातरम’ गीताचं सामुहिक गायन करण्यात आलं. नेरूळमधल्या शिरवणे गावातल्या एस. व्ही स्कूल आणि ज्युनियर कॉलेजच्यावतीनंही वंदे मातरमचं सामूहिक गायन करण्यात आलं.*

***सोलापूरमध्ये** आई प्रतिष्ठान आणि दयानंद शिक्षण संस्थेतर्फे आज दोन हजार विद्यार्थिनींनी सामूहिक वंदे मातरम गायन केले. यावेळी दोन हजार विद्यार्थिनींनी दीड एकर जागेत भारताचा १५० बाय १०० फुटांचा मानवी नकाशा साकारला.*

***यवतमाळमधे** उमरखेड इथल्या जिल्हापरिषद प्रांगणात सर्व शाळांनी आज वंदे मातरम चं समूहगायन केलं.*

***नांदेडमध्ये** श्री गुरूग्रंथ साहिबजी भवन इथं हजारो विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी वंदे मातरम् चं गायन केलं.*

***भंडाऱ्यात** लाखनी इथल्या समर्थ मैदानावर आज सकाळी विविध शैक्षणिक संस्थांमधल्या ४ हजार ७३२ विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् या गीताचं गायन केलं.*

***जालन्यात** भोकरदन इथल्या स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत, तसंच बदनापूर इथल्या पाथ्रीकर कॅम्पसमध्ये आज वंदे मातरम् या गीताचं सामूहिक गायन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.*

***रत्नागिरी** जिल्हाधिकारी कार्यालयातही आज वंदे मातरम् या गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं.)*

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करायच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या

याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं आज राज्य निवडणूक आयोगाला नोटिस बजावली आणि पुढच्या आठवड्यापर्यंत आपलं म्हणणं मांडायचे निर्देश दिले. काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांनी याबाबत दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली.

<><><><>

ICC महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ चं विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघातल्या स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव, या महाराष्ट्रातल्या तीन खेळाडूंचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या वर्षा निवासस्थानी सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी या तिघींना शाल, पुष्पगुच्छ, तसंच प्रत्येकी सव्वा दोन कोटी रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित केलं. तर या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना साडेबावीस लाख रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित केलं. महिला क्रिकेट संघाच्या सहाय्यक कर्मचारी वर्गालाही ११ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

महिला क्रिकेट संघाचा विश्वचषक यंदा भारताकडे आल्याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

<><><><>

ज्येष्ठ अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल दीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७१ वर्षांच्या होत्या. सुलक्षणा पंडित यांनी पार्श्वगायनानं आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यांनी हिंदी, मराठी, बंगाली, उडिया आणि गुजराती, या भाषांमध्ये गाणी गायली आहेत. सत्तरच्या दशकात त्यांनी अभिनयाची वाट चोखाळली. उलझन, संकोच, हेरा फेरी, अपनापन, खानदान, धर्म कांटा अशा विविध हिंदी चित्रपटांमधून त्यांनी भूमिका साकारल्या.

<><><><>

पुण्याच्या इंटर युनिव्हर्सिटीज सेंटर फॉर अस्ट्रॉनॉमी अँण्ड अस्ट्रोफिजिक्स अर्थात आयुका या संस्थेचे माजी संचालक आणि विख्यात शास्त्रज्ञ प्राध्यापक नरेश दधिच यांचं काल बीजिंग इथं हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. नरेश दधिच यांनी बिट्स पिलानी, पुणे विद्यापीठ इथून शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या गणित विभागात प्राध्यापक आणि नंतर विभागप्रमुख झाले. आयुकाच्या संकल्पना, स्थापना, आणि उभारणीत त्यांची महत्त्वाची भूमिका होती.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी आपल्या हत्येचा कट रचल्याचा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केला. ते आज अंतरवाली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. आपल्याला जीवे मारण्यासाठी अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आली, असा दावाही जरांगे यांनी केला आहे. पोलिसांनी या प्रकरणात अमोल खुने आणि दादासाहेब गरुड या दोन संशयितांना अटक केली होती.

जरांगे यांच्या आरोपानंतर, आपली आणि जरांगे यांची ब्रेन मॅपिंग टेस्ट करावी, तसंच या प्रकरणाची सीबीआयकडून चौकशी करावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//